# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक : 15.10.2026** **वार : गुरुवार**

---

**पाणी पुरवठा नियोजन**

पुढील वर्षाच्या 31 ऑगस्ट पर्यंत पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली. अल-निनोच्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचं काटकसरीने आणि नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्याचे निर्देश डूडी यांनी यावेळी दिले. जिल्ह्यातील  पवना, भामा आसखेड, चासकमान आणि नीरा धरण प्रकल्पांमध्ये सध्या 90 ते 95 टक्के पाणीसाठा उपलब्ध असला, तरीही पुढील वर्षापर्यंत पाणीपुरवठा टिकवून ठेवण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी 20 टक्के पाणी कपात करण्याच्या दृष्टीनं नियोजन करावं, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

**पुणे-दुष्काळ-सवलती**

पुणे जिल्ह्यातील दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या दहा तालुक्यांमध्ये शासनाच्या वतीनं देण्यात येणाऱ्या 12 प्रकारच्या सवलती आणि उपाययोजनांची अंमलबजावणी आणि नियोजनाचा, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत आढावा घेतला. पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या सवलती आणि उपाययोजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी संबंधित तालुक्यांतील अधिकाऱ्यांनी, आवश्यक ते नियोजन करावं, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

**एसआयआर-पुणे**

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत, मतदार यादी सुधारणांबाबत उपाययोजना सुचविणं आणि त्यासंदर्भातील अहवाल निवडणूक आयोगाला सादर करण्यासाठी, पुण्याच्या विभागीय आयुक्तांची, पुणे विभागासाठी 'मतदार यादी निरीक्षक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. येत्या 16 ऑक्टोबरला हे निरीक्षक पुणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या तक्रारी आणि अडचणी मांडाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**उडान**

केंद्र सरकारच्या सुधारित 'उडान' योजनेअंतर्गत सोलापूर-मुंबई आणि अमरावती-पुणे या दोन मार्गांवर विमानसेवा सुरू करण्याचा प्रस्ताव असल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज सांगितलं. यामुळे सोलापूर आणि अमरावती या शहरांचा राज्याच्या प्रमुख आर्थिक आणि शैक्षणिक केंद्रांशी थेट हवाई संपर्क निर्माण होणार आहे. विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी, पर्यटक आणि सर्वसामान्य प्रवाशांना याचा लाभ होण्याची अपेक्षा असून, या हवाई सेवांमुळे प्रवासाचा वेळ वाचण्याबरोबरच उद्योग, पर्यटन आणि रोजगाराच्या संधींना चालना मिळेल, असा विश्वास मोहोळ यांनी व्यक्त केला.

**कलाम जयंती-पुणे विद्यापीठ**

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज त्यांना अभिवादन करण्यात आलं. कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी आणि कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मितीच्या क्षेत्रात कलाम यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाचं यावेळी स्मरण करण्यात आलं. वाकड येथील इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस मध्ये देखील, कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला.

**गोवा-लघुपट महोत्सव**

येत्या 25 ऑक्टोबरला, पुण्यात लघुपट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. सारसबागेजवळील बाळासाहेब ठाकरे कलादालनातील सभागृहात या महोत्सवाचं उद्घाटन होणार आहे. या महोत्सवात विविध देशांतील 100 हून अधिक लघुपट प्रेक्षकांना पाहता येणार असून, तो विनामूल्य असल्याची माहिती महोत्सवाचे संचालक योगेश बारस्कर यांनी दिली. सर्वोत्कृष्ट लघुपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट अभिनेता यांसह एकूण 35 विभागांत पारितोषिकं प्रदान करण्यात येणार असून, विविध विभागांतील विजेत्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

**इन्स्पायर-मानक**

'इन्स्पायर-मानक' उपक्रमांतर्गत आयोजित 12 व्या राष्ट्रीय स्तरावरील, 'प्रदर्शन आणि प्रकल्प' स्पर्धेत सहभागी झालेल्या 62 युवा नवसंशोधकांचा, केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान तसेच पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते आज गौरव करण्यात आला. यावेळी, पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी गीता धनवडे हिला सन्मानित करण्यात आलं. सायकल चालविताना अधिक आरामदायी अनुभव मिळावा, या उद्देशाने गीताने आरामदायी आणि शरीराच्या रचनेला अनुरूप सायकल सीटची संकल्पना मांडली आहे.

**मराठी भाषा सप्ताह**

अभिजात मराठी भाषा सप्ताहाचा नुकताच समारोप झाला. यानिमित्ताने, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमानं आयोजित करण्यात आलेल्या छायाचित्र प्रदर्शनात, उत्कृष्ट छायाचित्रं सादर करणाऱ्या माध्यम छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल तापमान 34 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 18 पुर्णांक 4 दशांश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही हवामान साधारण असंच असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**